**नि. फौ. ख. क्र.२७/२०२१**
**सरकार वि. योगेश विजय काळे + ०२**
**निशाणी क्र.३४**

**<u>अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, मलकापुर, जिल्हा - बुलढाणा यांचे न्यायालयात</u>**
(पिठासीन अधिकारी : एस. एस. महाले)

## दोषारोप

मी एस. एस. महाले, अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, मलकापुर, ता. मलकापुर, जिल्हा बुलढाणा तुमच्यावर

१) योगेश विजय काळे,
वय – २८ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
राहणार- बेलाड, तालुका- मलकापुर, जिल्हा- बुलढाणा.

२) सोमेश्वर रामेश्वर संबारे **(मयत)**

३) मनोज उर्फ मोहन रामेश्वर संबारे,
वय – २५ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
राहणार- बेलाड, तालुका- मलकापुर, जिल्हा- बुलढाणा.

खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो -

दि.०५/०९/२०२० रोजी रात्री ०८.३० वाजताचे सुमारास या न्यायालयाचे स्थळसीमेत, मौजे बेलाड (बस स्टँड) येथे संबारे यांचे हॉटेल वर फिर्यादी नामे दिपक दिनकर चोखंडे उभा असताना तुम्ही आरोपी क्र.०१, ०३ व तुमचेसोबत मयत आरोपी क्र.०२ यांनी तुमचे समान उद्देशाचे पुर्नसरणार्थ आरोपी क्र.०१ चे नाव पोलीसांना सांगीतल्याचे कारणावरून तुमचेपैकी आरोपी क्र.०३ याने फिर्यादीचे कानावर व हातावर लाकडी काठी (टेंपे) ने मारहाण करून त्याला इच्छापुर्वक गंभीर दुखापत केली व त्याद्वारे तुम्ही आरोपींनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **११८(२)** सह वाचनीय कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे.

दुसरे त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीं क्र.०१ व ०३ सह मयत आरोपी क्र.०२ सोबत तुमचे समान उद्देशाचे पुर्नसरणार्थ वर नमुद

कारणावरून फियादीस लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली व त्याद्वारे तुम्ही आरोपींनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **११५(२)** सह वाचनीय कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे. अन्वये गुन्हा केला आहे.

तिसरे त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीं क्र.०१ व ०३ सह मयत आरोपी क्र.०२ सोबत तुमचे समान उद्देशाचे पुर्नसरणार्थ नमुद फिर्यादी यास जिवे मारण्याचे धमकी देवून त्यांचे मनात दहशत निर्माण केली व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **३५१** सह वाचनीय कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे.

शेवटी त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीं क्र.०१ व ०३ सह मयत आरोपी क्र.०२ सोबत तुमचे समान उद्देशाचे पुर्नसरणार्थ फिर्यादीस शिवीगाळ करून त्याला सार्वजनिक शांतता भंग करण्यास व गुन्हा करण्यास प्रोत्साहीत केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **३५२** सह वाचनीय कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्ह्याकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2026.01.17 16:51:51 +0530

**स्थळ : मलकापुर,** **(एस. एस. महाले)**
**दिनांक :१७/०१/२०२६** **अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, मलकापुर**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपींना उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2026.01.17 16:51:57 +0530

**स्थळ : मलकापुर,** **(एस. एस. महाले)**
**दिनांक :१७/०१/२०२६** **अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, मलकापुर**